# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र.५९८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २५/०८/२०१७

**१) मोटार सायकल चोरी. :–**

दिनांक २३+२४/०८/२०१७ चे १२.०० ते ०३.०० वा. दर.यातील फिर्यादी श्रीकांत पुरूषोत्तम रामटेके वय ३१ वर्ष रा. आंबेडकर वार्ड भंडारा याची होंन्डा ॲक्टीव्हा मोटार सायकल क्र. एमएच ३६/एन ८९४३ कि. २५,०००/रु ची ही स्वत:चे मेडीकल दुकानासमोर ठेवुन कामाकरीता नागपुरला गेला असता व सकाळी दुकानात परत आला असता मोटार सायकल ठेवलेल्या ठिकाणी दिसुन आली नाही कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरून नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. चाबुकस्वार पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

**२) अज्ञात वाहन चालकाच्या धडकेत एकाचा मृत्यु . :–**

दिनांक २३/०८/२०१७ चे २०.३० वा. ते २१.०५ वा. दर. यातील मृतक श्रीकृष्ण नत्थुजी गभने वय ६३ वर्ष रा. पेट्रोलपंप ठाणा हे आपले होन्डा डि.ओ. मोटार सायकल क्र. जिए ०७ डी ९९९६ ने पेट्रोलपंप ठाणावरून शहापुर कडे एनएच ०६ रोड ने जात असता, वाकडा पुलीया समोर यातील अज्ञात वाहन चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन मृतकचे गाडीला धडक मारून गंभिर जखमी करून त्याचे मरणास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता व जखमीला उपचाराकरिता मदत न करता पळुन गेल्याने, फिर्यादी नरेश श्रीकृष्ण गभने वय २३ वर्ष रा. आंबेडकर वार्ड पेट्रोलपंप ठाणा यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९,३३७,३०४ (अ) भादंवि. सहकलम १३४,१८४/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. ताराम पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**३) शेतीच्या वादावरून दाताने चावा घेवुन दुखापत केल्याने गुन्हा नोंद:–**

दिनांक २३/०८/२०१७ चे १७.३० वा. दर. यातील फिर्यादी श्रावण भैयाजी हटवार वय ७५ वर्ष रा. परसोडी हा शेतात हजर असतांना आरोपीने माझी शेती आहे मी रोवतो असे बोलला असता, फिर्यादीने आरोपीस तुझ्या कडुन दिड लाखात विकत घेतली असुन तुझा काय अधीकार आहे असे बोलला असता, आरोपीने फिर्यादी सोबत लांबाझोंबी करून फिर्यादीचे उजवे हाताला दाताने चावा घेवुन दुखापत केल्याने व मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३२४,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना.सार्वे पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**४) लाकडी काठीने हातावर मारून जखमी व शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद:–**

दिनांक २४/०८/२०१७ चे ०६.१५ वा. दर. यातील फिर्यादी ही आपले घरी झाडझुड (साफसपाई) करित असता यातील आरोपीने तिचे घरी येवुन हा घर माझे नावी करून दे म्हणुन भांडण करून फिर्यादीचे डावे हाताचे मनघटावर चावा घेवुन व लाकडी काठीने डावे हाताचे भुजेवर मारून जखमी करून शिवीगाळ केल्याने व जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३२४, ५०४, ५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. जाधव पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**५) दारूच्या कारणावरून बासाच्या काठीने डोक्यावर,हातावर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद:–**

दिनांक २४/०८/२०१७ चे १७.०० वा. दर. यातील आरोपीने फिर्यादी ला तुझ्या भावाने मला दारू विक्री करू दिली नाही, गावात दारू बंदी करायची आहे असे म्हणुन भांडण करून बासच्या काठीने डोक्यावर,हातावर मारून जखमी केले जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी विवेक मारोती गडपायले वय ३२ वर्ष रा. विरली यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३२४, ५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. भोगे पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**६) विटाने डोक्यावर व पाठीवर काठीने मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद:–**

दिनांक २४/०८/२०१७ चे १७.०० वा. दर. यातील फिर्यादी शेषराव रघुनाथ गडपायले वय ४४ वर्ष रा. विरली खंदार हा आपले पानठेल्या समोर उभा असतांना यातील आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादी हा आमची दारू पकडण्या करीता पोलीसांना फोन करतो, असे बोलुन भांडण करून आरोपी क्र. १ ने विटाने डोक्यावर मारून जखमी केले व आरोपी क्र. २ ने पाठीवर काठीने मारून जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३२४,५०६, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. भोगे पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**७) महिलेला शारीरीक व मानसिक त्रास दिल्याने गुन्हा नोंद:–**

मार्च २०१७ ते दि. ११/०८/२०१७ यातील फिर्यादी ही दोन्ही मुलीला घेवुन सासरी असतांनी तिचा पती आरोपी क्र. १ याने तुला २ मुली झाल्या आहेत व तु माहेरून कुंटुब नियोजनाचा ऑपरेशन करून आली आहे , तु माझे सर्व डुबवीली आहे ,म्हणुन तु ऑपरेशन खोलण्याकरीता आपले वडीला कडुन ५०,०००/रु घेवुन ये असे आरोपी क्र.१ ने बोलुन आरोपी क्र. २ ते ४ सह संगनमत करून फिर्यादीचे डोक्याचे केस ओढुन तिचे सोबत भांडण करून पाठीवर, गालावर मारपीट केले व तिला जिवाने मारण्याची धमकी देवुन मानसीक व शारीरीक त्रास दिले दि. ११/०८/२०१७ रोजी फिर्यादीने पो.स्टेला रिपोर्ट दिल्याने व महीला समुपदेशक लाखनी याचे दि. २३/०८/२०१७ चे लेखी पत्रावरून व फिर्यादीच तोंडी रिपोर्ट वरून पो.स्टे. लाखनी येथे कलम ४९८(अ) ३२३,५०४,३४ भांदवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.पुढिल तपास पोहवा सार्वे पो.स्टे लाखनी हे करित आहेत

**८) ईलेक्ट्रीक शॉक लागुन इमाचा मृत्यु. :–**

दिनांक २४/०८/२०१७ चे १९.४० वा. दर. यातील मृतक उमेश नारायनराव राजाभोज वय ५० वर्ष रा. जमनालाल बजाज वार्ड भंडारा यास ईलेक्ट्रीक शॉक लागल्याने त्यास औषधोपचारा करीता सा.रू. भंडारा येथे आणले असता डॉ. ने चेक करून मृत घोषीत केल्याने डॉ मेमो वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. कन्नाके पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**९) अचानक प्रकृती खराब झाल्याने औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु. :–**

दिनांक २४/०८/२०१७ चे ०.७०० वा. दर. यातील मृतक संतोष धनराज गायधने वय ३५ वर्ष रा. मानेगाव याची अचानक प्रकृती खराब झाल्याने त्यास औषधोपचारा करीता सा.रू. भंडारा येथे भरती केले असता उपचारादरम्यान २० ते ३० मिनीटांनी मरण पावल्याने फिर्यादी रामचंद्र दसाराम भोंगाडे वय ३० वर्ष रा. मानेगाव याचें तोंडी व डॉ. मेमो वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बहादुरे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**१०) अवैध दारु/जुगार अडयावर धाडी . :–**

दिनांक २४/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे वरठी, पालांदुर व मोहाडी, येथे दारू/ जुगार अडयावर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १३ लिटर हातभटटी दारु किंमती ११,००/–रु. तसेच व जुगारातुन किंमती २१५/–रु. असा एकुण किमती १,३१५/रु चा माल जप्त करण्यात आला आहे.

**११) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक २४/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १०३ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली अवैध प्रवासी ०४ असून तीन सिटर वाहनांवरती १४ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ८५ केसेस करण्यात आलेल्या आहे.

25.8

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता